पीएच.डी.संशोधन आराखडा

"पुणे जिल्ह्यातील पर्यटन विकास व रोजगाराच्या संधी-एक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्याशाखे अंतर्गत भूगोल विषयातील पीएच.डी. (Ph.D)

पदवीकरिता सादर करण्यात येणारा संशोधन आराखडा

❖संशोधक❖

गोंड रामराव संभाजी

❖संशोधन मार्गदर्शक❖

डॉ. वाघमारे नामदेव केशवराव

भूगोल विभाग प्रमुख

इंदिरा गांधी महाविद्यालय सिडको, नांदेड

मे २०१९

“पुणे जिल्ह्यातील पर्यटन विकास व रोजगाराच्या संधी-एक अभ्यास”

प्रस्तावना :-

मानव हा भ्रमणशिल प्राणी आहे. अगदी प्राचीन काळापासून मानव प्रवास करीत आला आहे. या प्रवासाच्या आवडीमुळे कोलंबसने अमेरिकेचा शोध लावला. प्राचीन काळी प्रवास हि संकल्पना अगदी संकुचित होती. फक्त श्रीमंत लोक प्रवास करीत असत एक शतकापूर्वी १०० मैलाचा प्रवास (१६० कि.मी.) हा खुपच लांबचा समजला जायचा. पूर्वीच्या काळी प्रवासासाठी घोड्याचा वापर केला जात असे. आज प्रवासाचे स्वरुप बदलून त्याची जागा पर्यटकाने घेतली आहे. पर्यटन म्हणजे व्यक्तीने आपल्या राहात्या ठिकाणापासून इतरत्र काही काळासाठी केलेला प्रवास होय.

विसाव्या शतकातील व एकविसाव्या शतकात सामाजिक व आंतरराष्ट्रिय स्तरावर दुरगामी परिणाम करणारी योगवाही आर्थिक क्रिया म्हणजे पर्यटन होय. प्रवास आणि पर्यटन हा जगातील अग्रेसर व्यवसाय असून त्यामुळे जास्तीत जास्त लोकांना रोजगार प्राप्त होतो. अनादी कालापासून मानवाचा प्रवास सुरु असून अनभिज्ञ ठिकाणांचा ठाव घेण्याची ईर्ष्या व प्रवास यांनी मानवी मनास मोहीत केलेले आहे. प्राचीन मानव अजाणतेपणाने प्रवास करीत असे. एकविसाव्या शतकाच्या उंबरवठ्यावर असलेला मानव आवड, कुतूहल व संशोधक म्हणुन प्रवास करतो. अनभिज्ञ व अज्ञाताचा ठाव घेणे हे आर्थिक सुज्ञपणाचे एक लक्षण आहे. असे भारतातील माजी अमेरिकन राजदुत जे. के. गॉलब्रेथ म्हणतात. पर्यटनामुळे ते साध्य होते. पर्यटनामुळे प्रत्येक देशाला परकिय चलन मिळत असते. भिन्न विभिन्न समाजातील, देशांतील लोकांचा संपर्क पर्यटनामुळे निर्माण होतो. राष्ट्रीय एकात्मतेस अत्यंत पोषक अशी वैचारिक देवाण-घेवाण पर्यटनामुळे होते. आंतरराष्ट्रिय सामंजस्य वाढण्यासाठी मदत होते.

पर्यटनामुळे रोजगाराला संधी मोठ्या प्रमाणात निर्माण होतात, आणि समस्याही तितक्याच प्रमाणात निर्माण होतात. पर्यटनामुळे पर्यटन स्थळांचा विकास हा होत जातो त्याच बरोबर ज्या प्रदेशामध्ये जी जी पर्यटन स्थळे आहेत त्या त्या प्रदेशाचा विकास विकास हा मोठ्या प्रमाणावर होत जातो. पूणे जिल्ह्यातील एकूण पर्यटन स्थळाचा विचार केला तर काही पर्यटन स्थळे धार्मिक आणि ऐतिहासिक तर काही थंड हवेचे पर्यटन स्थळे आहेत. या सर्व पर्यटन स्थळांचा अभ्यास प्रस्तूत संशोधनात करण्यात येणार आहे.

“पुणे तेथे काय उणे” अशी देशभरात ‘पुणे’ जिल्ह्याची ख्याती आहे. जिल्ह्याचे मुख्य ठिकाण. मुळा-मुठेच्या संगमावर असलेलं, एके काळी पेशव्यांची राजधानी असलेलं हे शहर आज महाराष्ट्रातील महत्वाचे ऐतिहासिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व औद्योगीक केंद्र मानले जाते. विद्येचे माहेरघर म्हणून ही या नगरीचा परिचय सर्वदूर आहे. पुणे नगरी आणि जिल्ह्याला इतिहासकाळापासूनच अनन्यसाधारण महत्व आहे. या नगराला वा जिल्ह्यालाही पडणारी काही स्वप्ने आहेत. तसाच गौरवशाली भूतकाळही आहे.

साधारणत: इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात पुणे शहराचा प्रथम नामोल्लेख मिळतो. या नगराची पूर्वीची अनेक नावे इतिहासात आढळतात. पुन्नाटा (इ.स.दुसरे शतक टॉलेमी यांच्या लिखाणावरुन) पुनगडी, पुन:विषय, पुणे विषय, पुण्यपूर (८ वे शतक राष्ट्रकूट काळ), कसबे पुणे (मोगलकाळ), इत्यादी नावे संदर्भ ग्रंथात मिळतात. शिवाय ‘पुण्य’ या शब्दातून ‘पुणे’ नावाची उत्पत्ती झाली असावी असाही एक तर्क आहे.

पूणे जिल्हा शहराचे स्थान १८.३१ उत्तर अक्षांश व ७३.५१ पूर्व रेखांश असून शहराच्या चारही बाजूला टेकडी व माळांनी वेढलेले आहे येथील देखावे मोहात पाडणारे आहेत येथील सरासरी वार्षिक पर्जन्य ६६.१३ सेमी पाऊस पडतो. येथील सरासरी तापमान १७.२ सेल्सिअस इतके असते. येथील हवामान लक्षात घेता आक्टोंबर ते जानेवरी हे महिने शहराला भेट देण्यासाठी आदर्श आहे.

पूणे जिल्ह्याचे भौगोलिक स्थान १७° : ५४ ते १९° : २४ उत्तर अक्षांश, ७३° : १९ ते ७५° : १० चौ.कि.मी. आहे. पूणे शहर महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाचे शहर आहे. पूणे जिल्ह्याला विकास जस जसा वाढत गेला त्या त्या प्रमाणात रोजगाराची संधी मोठ्या प्रमाणात निर्माण होत गेला.

पर्यटनाचा अर्थ :-

पर्यटन ही संज्ञा प्रवास (Tour) या शब्दाशी संबधीत आहे. पर्यटन (Tourism):- The activity of tourism for pleasure, the occupation for providing all facility for tourist; सुखपर्यटन, प्रवाशांच्या सुखसोयी पुरवणारा व्यवसाय म्हणजेच पर्यटन होय. प्रवास (Traval):- To go on journey प्रवास करणे, देशाटन असे अर्थ शब्दकोशात सापडतात.

पर्यटन ही संज्ञा प्रवास या शब्दाशी संबंधित आहे. Tourism या शब्दाची उत्पत्ती Tour, Tornas, Tornus या लॅटिन शब्दापासून झालेली आहे. लॅटिनमधील Tornos चा अर्थ आहे, Circle वर्तुळ. Tourism म्हणजे याचा अर्थ एक वर्तुळाकार वा गोलाकार

प्रवास असा होतो. इ.स. १६४३ मध्ये हा शब्द प्रथम वापरला गेला आणि त्याचा संदर्भ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे किंवा वर्तुळाकार प्रवास करणे असा होय.

'Tours' या शब्दाची आणखी एक उत्पत्ती असून हा शब्द हिब्रु भाषेतील असून तो Toran या शब्दापासून आलेला आहे. Toran याचा अर्थ शिकणे, शोध घेणे असा होतो. Toran या नावाचा ज्यु धर्मीयांचा कायद्याचा ग्रंथ आहे. या शब्दानुसार Tour चा अर्थ प्रवाशाने केलेला प्रवास, ठिकाणाचा शोध घेणे होय. फ्रेंच भाषेत Grand Tour ही संज्ञा वापरली जाते आणि त्याचा अर्थ फ्रान्स, जर्मनी स्वित्झर्लंड व इटली या देशातून केलेला प्रवास असा आहे.

आधुनिक पर्यटन हा शब्द तेराव्या शतकात प्रचलित झाला. याचा अर्थ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करणे आणि मुळ ठराविक काळात परत येणे असा होतो. या व्याख्येनुसार पर्यटन करणारा भ्रमंती करुन आपल्या मुळ ठिकाणी परत येतो.

पर्यटनाच्या व्याख्या (Tourism Definations):-

१) जोस ॲरिलागा:- "सायकलवरुन फिरणे, गिर्यारोहन, तळ ठोकणे, नौकाविहार करणे, खेळ इत्यादीसाठी भ्रमंती करणे म्हणजे पर्यटन होय."

२) ऑस्ट्रेलियन अर्थशास्त्रज्ञ हर्मर (१९१०):- "परदेशी माणसाचे एखाद्या देशात, प्रदेशात वा शहरात आगमन, वास्तव्य भ्रमंती आणि तेथुन जाणे म्हणजे पर्यटन होय."

३) प्रा. हुंझीकेर व फ्रँक:- "कायम स्वरुपाची वस्ती न करण्याच्या हेतूने व उत्पादनाशी संबंधित नसलेली, अपरिचीत व्यक्तीच्या भ्रमंतीतून प्रस्थापित झालेली अपूर्ण घटना व संबंध म्हणजे पर्यटन होय."

पर्यटनाचे स्वरुप :-

अगदी सुरुवातीस पर्यटनाचे स्वरुप प्रामुख्याने आनंद मिळविणे हे होते. गेल्या शतकामध्ये पर्यटनाच्या झालेल्या लोकशहीकरणांमुळे पर्यटक संख्येत उल्लेखनीय वाढ होत आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर पाश्चात्य देशातील उच्चशिक्षित समाजातील लोक निरनिराळ्या ठिकाणचे सृष्टिसौंदर्य पाहण्याच्या निमित्ताने देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळांना भेटी देवू लागले.

अर्थातच त्या काळात पर्यटकांची संख्या मर्यादित स्वरुपात होती. अगदी सुरुवातीला पर्यटन केवळ आनंद व मौजमजा या उद्देशाने होत असे. पण दुसऱ्या महायुध्दानंतर पर्यटन संज्ञेमध्ये केवळ मौजमजा, आनंद लुटण्याची कल्पना मागे पडली. पुर्वीच्या काळी

समाजातील केवळ श्रीमंत लोकच पर्यटनाचा आनंद लुटत असत. पण सध्या यात बदल झालेला दिसून येतो.

आता मात्र अगदी सामान्य आर्थिक परिस्थिती असलेले लोक सुध्दा पर्यटनाला जातात. त्या प्रत्येकाच्या पर्यटनाच्या कल्पना वेगवेगळ्या आहेत. पण सध्या पुर्वीइतका पर्यटनाला वेळ देता येत नाही. दिवसेंदिवस आर्थीकदृष्ट्या पर्यटन महाग होत आहे.

पुर्वीच्या काळात नैसर्गीक, धार्मिक स्थळे महत्वपूर्ण असायची. पर्यटनात झालेल्या बदलामुळे खेळासाठी प्रसिध्द अशी पर्यटनस्थळे उदयास आली आणि या पर्यटनात देखील मोठ्या प्रमाणात वाढ झाली. जगातील काही खेळ असे होते की, ते फक्त उच्चभ्रु लोकांपुरते मर्यादित होते. पण आज सर्वसामान्य लोकांना देखील घोडदौड, नेमबाजी, टेनिस इत्यादी स्पर्धा उपलब्ध होत आहेत. सध्या २१ व्या शतकात पर्वतरोहन, बर्फावरील स्केटिंग, पोहणे इत्यादी खेळ अधिक लोकप्रिय होत आहेत. याचमुळे पर्यटकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते.

जागतीक स्तरावर मुक्त व्यापाराला वाव मिळाल्यामुळे प्रवासी व व्यावसायिकांना व्यापारासाठी आंतराष्ट्रिय प्रवास करणे सुलभ झाले आहे. खाजगीकरण व परदेशी गुंतवणूक हे आधुनिक युगातल्या औद्योगीक विकासाचे सुत्र आहे. हे विविध देशाच्या शासनाने जाणून घेतलेले असल्याने या प्रक्रियेला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्विकारले आणि त्यामुळे पर्यटन उद्योगाच्या स्वरुपात बदल झालेला दिसून येतो.

भारतामध्ये अधिकांश पर्यटक धार्मिक व सांस्कृतिक घटकाकडे आकर्षीत होतात आणि हेच पर्यटक संगीतकला, लोककला, नाटक, क्रिडा, सागरी अन्न महोत्सव प्रदर्शन, स्केटिंग, शिबीर, परिषदा, पॅरासेलिंग, मोटार बोट, वॉटर स्कुटर, वन्य प्राण्यांच्या स्पर्धा इत्यादी पर्यटन स्थळांकडे आकर्षीत होत आहेत. क्रिकेट हा खेळ भारतीय लोकांचा अत्यंत लोकप्रिय खेळ असल्यामुळे भारतामध्ये गेल्या चार वर्षापासून २०-२० आय. पी. एल. क्रिकेट पर्यटकांना आकर्षीत करत असून त्यामुळे भारतीय व परदेशी पर्यटकांची संख्या वाढत आहे.

सध्याचे युग हे संगणकाचे युग आहे. इंटरनेटच्या महाजाळ्यामुळे आपल्याला घरीबसून पर्यटन स्थळांची माहिती मिळते. तसेच संगणकीय आरक्षण पध्दतीमुळे हॉटेल व्यवसाय, विमान कंपन्या, रेल्वे प्रवास, बस प्रतिनिधी व पर्यटक यांच्या मधील दुवे अधिक मजबूत याचमुळे होत गेले. अशाप्रकारे पर्यटनाच्या स्वरुपात वरचेवर बदल झालेले दिसून येतात.

पर्यटनाची व्याप्ती (Scope of Tourism):-

अगदी प्राचीन काळी पर्यटनाचा इतिहास पाहिल्यास पर्यटन हे अतिशय मर्यादित स्वरुपाचे होते. त्या काळात कोणत्याही प्रकारची वाहतुकीची साधने नव्हती. मनुष्य प्राणी पायी, घोडे, उंट, खेचर, हत्ती किंवा घोडीचा वापर प्रवासासाठी करत असे. हा प्रवास नातेवाईकांना भेटण्यासाठी, व्यापारासाठी, यात्रा इत्यादी निमित्ताने होत असे. त्याकाळात पर्यटनाची व्याप्ती मर्यादित स्वरुपाची होती.

सागरी मार्गाचा वापर प्रवासासाठी जेंव्हा करण्यात येवू लागला तेंव्हा प्रवास लांबपल्ल्याचा होवू लागला. हा सागरीप्रवास मुख्यत: नव नविन प्रदेशांचा शोध घेणे, तेथील प्रदेशाची माहिती मिळविणे, त्याचा अभ्यास करणे इत्यादी उद्देशाने होवू लागला आणि पर्यटनाची व्याप्ती वाढण्यास मदत होवू लागली.

सतराव्या शतकापर्यंत पर्यटन हे शोधकार्य व व्यापार यासाठीच होत होते. नंतर रोमन साम्राज्यात पर्यटनाची कल्पना बदलली आणि पर्यटन हे विशेषत: मनोरंजन, आनंद व मौजमजा यासाठी होवू लागले अशाप्रकारे आनंद, मौजमजा, धार्मिक उद्देशाने प्रवास करण्याची कल्पना पुढे आली आणि त्यामुळे पर्यटनाची प्रगती होवू लागली. त्यामुळे पर्यटनाची व्याप्ती व क्षेत्र विस्तृत होवू लागले.

अठराव्या शतकात युरोपमध्ये वार्षिक सुट्टीची कल्पना पुढे आली आणि पर्यटनामध्ये अमुलाग्र बदल होवू लागला. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला जगभरात रेल्वेमार्ग सुरु झाले. विसाव्याशतकाच्या सुरुवातीला जगात रस्त्यांचा विकास झाला. रस्त्यावरुन मोटारी धावू लागल्या त्यामुळे पर्यटनाच्या क्षेत्रात अधिक बदल होवू लागले. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात हवाई वाहतुकीच्या विकासामुळे पर्यटकांना जगाच्या कानाकोपऱ्यात पर्यटनासाठी जाण्याची संधी उपलब्ध झाली. त्यामुळे पर्यटनाची व्याप्ती आणखी वाढली आणि पर्यटनाचे क्षेत्र विशाल बनले.

व्यक्तिच्या राहणीमानात झालेले बदल, वाढते दरडोई उत्पन्न, पर्यटनाभिमुख दृष्टिकोण वाढल्यामुळे, वाहतुकीच्या जलद सोयी उपलब्ध झाल्यामुळे, वाढलेले साक्षरतेचे प्रमाण इत्यादी अनुकूल घटकांमुळे पर्यटकांच्या जागतिक संख्येत झपाट्याने वाढ होत आहे. २००१-०२ मध्ये जागतिक पर्यटकांची संख्या ६२५ दशलक्ष इतकी होती. त्यानंतर त्यामध्ये दरवर्षी सुमारे १५ टक्कांनी वाढ होत गेली. याच काळात भारतात देशांतर्गत पर्यटकांची संख्या सुमारे १७५ दशलक्ष इतकी होती. यावरुन पर्यटन व्यवसायाच्या विकासाची कल्पना येईल. या सर्वांचा परिणाम म्हणजे या व्यवसायाची सातत्याने वाढत जाणारी व्याप्ती होय.

अशाप्रकारे अगदी सुरुवातीला पर्यटनाची व्याप्ती ही मर्यादित होती त्यात काळानंतर झालेले बदल आपण वर पाहीले आहे. प्राचीन काळी पर्यटनाची व्याप्ती मर्यादित होती. जस जसे शतके बदलत गेली तसतशी पर्यटनाची व्याप्ती वाढलेली आपणास दिसून येते.

पर्यटनावर परिणाम करणारे घटक (Factors Affecting on Tourism)

पर्यटनावर परिणाम करणारे अनेक घटक आहेत. परंतु यात प्राकृतिक (भौगोलिक), धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक घटक महत्वाचे आहेत. प्रदेशाचे स्थान व सुगमता हा घटक पर्यटन व्यवसायावर अत्यंत परिणाम करणारा घटक आहे. दाट लोकवस्तीच्या जवळ असलेली चांगली वाहतुक व्यवस्था असलेली पर्यटन स्थळे अधिक सुगम असल्याने झ ापाट्याने विकसित होतात. पर्यटन हे भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक इत्यादी दृष्ठीने होत असले तरी पर्यटनाचा विकास बहुतांश भौगोलिक घटकांवर अवलंबून असतो. या घटकांचाच पर्यटनावर परिणाम करणारे भौगोलिक घटक असेही म्हणतात.

पर्यटनाचे आर्थिक महत्व :-

पर्यटनाचे पर्यावरणांशी फार जवळचे नाते आहे. पर्यटनाचा घनिष्ठ संबंध विविध स्थळांशी असतो. स्थलवैशिष्ठ्यांच्या व विविध परिसरांच्या परिणामामुळे पर्यटक आकर्षिक झालेले असतात. उदा. दार्जेलिंग, पंचमढी, उटकमंड, माथेरान, लोनावळा उत्साहावर्धक हवा पर्यटकांना आकर्षित करते. परिसरगुणवत्ता व वैशिष्ठ्ये सर्वत्र सारखी नसतात. त्यात बदलही होतात व हे परिवर्तन भूगोलाच्या अभ्यासकांना इतरापेक्षा चटनक समजते. एखाद्या स्थळासारखेच काही परिसर वैशिष्ठ्ये दुसऱ्या स्थळी असू शकतात. पर्यटकांची गर्दी टाळण्यासाठी समान स्थलवैशिष्ठ्ये व निसर्गसौंदर्य असणारी ठिकाणे पर्यटकांना माहिती करुन देणे, त्यांची सुगमता नियोजनकारांच्या नजरेस आणून देण्याचे कामही भूगोलतज्ञांना करता येते. अशा पर्यायी स्थळांचा विकास करणे, त्याठिकाणी ये-जा करण्याचे विविध मार्ग, ढोरवाटा, झरे व पाणवठ्याच्या जागा व नैसर्गीक जलाशय, डोंगरावरील सुरक्षित कडेकपाऱ्यांची माहिती गोळा करुन त्याचे आराखडे व नकाशे प्रसिध्द करण्याचे कामही भूगोलतज्ञ करु शकतात. याद्रष्टिकोणातून खानदेश आणि विदर्भातील थंड हवेची ठिकाणे अनुक्रमे तोरणमाळ आणि चिखलदरा ही माथेरान आणि महाबळेश्वरला पर्यायी थंड हवेची स्थळे होऊ शकतात.

पर्यटन व त्याच्याशी निगडीत असलेल्या व्यवसायांच्या भूरचनेशी, स्थलरुपांशी व भूदृष्यांची घनिष्ठ संबंध असतो. भूदृष्टांच्या किंवा स्थलरचनेच्या वैशिष्ठ्यांमुळेच पर्यटन व्यवसाय, नायगारा, धबधबा (उत्तर अमेरिका), जोग फॉल (कर्नाटक राज्य) अमरनाथ (हिमालय) इत्यादी ठिकाणी विकसित होत असतो तेथील रुपाकृतीमध्ये होणारे परिवर्तन

पर्यटन स्थळी निर्माण होणाऱ्या सांस्कृतिक दृष्यांमुळे होत असते. मानवी क्रिया प्रक्रियांमुळे पर्यटनस्थळी भावी कालात काय घडणार आहे, याचे भाकीत व अंदाज भूगोलतज्ञ कार्यक्षम रीतीने सांगू शकतात. भूगोलचा अभ्यास केल्यानेच अंदाज वर्तविण्याचे कलाकौशल्य त्यांच्याकडे आलेले असते.

पर्यटनाचा संबंध सामाजिक भूगोलाशी येतो. विकसित देशांतील पर्यटक विकसनशिल देशांत आल्यानंतर त्या देशातील त्यांना सेवा देणारे लोक प्रथम त्यांच्या ऐश्वर्यामुळे दिपून जातात. नंतर जेंव्हा त्यांचे विचारचक्र सुरु होते तेंव्हा त्यांच्या ऐश्वर्यामागे असलेले घटक म्हणजे भरपूर काम, विज्ञानाधिष्ठित विचार, अंधश्रध्दांचा अभाव, स्वच्छता, वक्तशीरपणा, टापटीप, इत्यादींचे महत्व पर्यटन विभागातील लोकांना कळू लागते. आपल्याकडील उणिवा व पर्यटनाचे गुण यांचा तौलानिक अभ्यास व विश्लेषन सुरु होते. त्यामुळे पर्यटन ही सर्वसमावेशक व अनेक सामाजिक मूल्यांची कदर करणारी एक योगवाही व सांघिक क्रिया समजली जाते. पर्यटनामुळे सांस्कृतिक परिणाम घडून येतात. पर्यटकांच्याबरोबर जी क्रियाप्रक्रिया स्थानिक लोकांची होते त्यामुळे कालबाह्य झालेल्या रुढींचा त्याग करणे सोपे जाते.

स्थलांतर पर्यटन यांच्या आकृतीबंधाचा विचार फक्त भूगोलाच्या आभ्यासकांच्या कडूनच योग्यप्रकारे केला जातो. स्थलांतर ही आर्थिक, सामाजिक-राजकीय अशी क्लिष्ट क्रिया असल्यामुळे व तिचे दूरगामी परिणाम होत असल्यामुळे त्या क्रियेचा बहुशास्त्रीय अभ्यास भूगोलाचे अभ्यासकच योग्यरीतीने करु शकतात. पर्यटन हा तृतीय स्तरावरील आर्थिक व्यवसाय असल्याने त्याचा अभ्यास भूगोसलतज्ञ आर्थिक भूगोलाही करतात. पर्यटन हा जगातील अग्रेसर व्यवसाय झालेला असून पर्यटनामुळे बहुमोल परकीय चलन मिळते. पर्यटकास ग्राहक मानतात. हा ग्राहक पर्यटनस्थळी इतर ठिकाणाहून आलेला असतो. स्वत:चे पैसे खर्च करुन तो विश्रांती, शीतल वातावरण, करमणूक या गोष्ठी विकत घेतो. पर्यटनस्थळी त्याचा मुक्काम असेपर्यंत त्याला चवदार अन्न, पाणी, सहलीसाठी मार्गदर्शक, वाहतूक इत्यादी सेवांची गरज असते. जाताना आठवण म्हणून तो काही कलाकुसरीच्या व स्थानिक वैशिष्ठ्ये असणाऱ्या वस्तू घेऊन जातो. त्यामुळे बाहेरील पैसा पर्यटनस्थळी उपलब्ध होतो व आर्थिक चलनवलन घडून येते. त्यामुळे पर्यटनास “अदृष्य निर्यात” असेही म्हणतात.

पर्यटनाचे मानवी जीवनातील स्थान अनन्यसाधारण असे आहे असे म्हटल्यास चूकिचे ठरणार नाही कारण मानवी जीवन हे विविध भावनेनी नटलेले आहे जसे सुख, दु:ख त्यामुळे मानव जेंव्हा काही मानसिक तनावात असतो तेंव्हा तो आपल्या तनावातून मुक्त

होण्यासाठी पर्यटनासाठी गेल्यास त्यापासून त्याला नक्कीच सुटका मिळून आनंद प्राप्त होत. त्याचबरोबर आज भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात जर पर्यटनाचा विकास केल्यास अनेक बेराजगारांना रोजगाराच्या संधी प्राप्त होण्यास मदत होते म्हणून व्यक्ती व राज्याच्या आर्थिक प्रगतीच्या दृष्टिने पर्यटन महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते.

प्रसिध्द विचारवंत बॉश यांच्या मतानुसार पर्यटनाचा स्थानिक लोकसंख्येच्या स्थलांतरावर जो परिणाम होत असतो त्याचा अभ्यास भूगोलतज्ञांनी करणे आवश्यक आहे. पर्यटन स्थळे विरळ लोकवस्तीच्या भागात असल्याने पर्यटन प्रकल्पांचा विकास करणे आवश्यक आहे. पर्यटन स्थळे विरळ लोकवस्तीच्या भागात असल्याने पर्यटन पकल्पांचा विकास अनेक ठिकाणी बाहेरुन आलेल्या लोकांमुळे होतो. उदा. हिमालयात पुष्पखोरे (Valley of Flowers) राणीखेत, अल्मोरा, कुलूमनाली ही याप्रकारची वैशिष्ट्यपूर्ण उदाहरणे मानली जातात. अशाप्रकारे पर्यटनाचे महत्व अनन्यसाधारण मानले जाते.

पर्यटन हा एक आर्थिक व्यवसाय आहे. या व्यवसायासाठी प्रत्यक्ष खर्च आणि अप्रत्यक्ष खर्च येतो. प्रत्यक्ष खर्चामध्ये वाहतूक, दळणवळण, निवास, व्यवस्था, भोजन व पैसे, खरेदी व सेवा इत्यादी खर्चाचा समावेश होतो. तर पर्यटनाचे उत्पन्न म्हणजे पर्यटकांना वस्तू व सेवा पुरवून मिळविलेले उत्पन्न होय. या उत्पन्नाचा अर्थव्यवस्थेवर प्रत्यक्ष परिणाम होतो. पर्यटनावरील अप्रत्यक्ष किंवा दुय्यम खर्चामध्ये व्यापारी वस्तू ज्या इतर व्यापारी किंवा उद्योगाकडून खरेदी केले असतात अशांचा समावेश होतो.उदा. अन्नधान्य, भाजीपाला, फळे, पेये, फर्निचर, लाकडी सामान, इतर घरगुती वापराच्या वस्तू, खेळाचे साहित्य आणि इतर सुविधा ज्या त्या पर्यटकांना त्यांच्या मागणीनुसार पुरविण्यात येतात.

प्रसिध्द पर्यटन विचारवंत एल. जी. रिचर्डस यांनी त्यांच्या पर्यटनाचे वास्तविक महत्व (Real Importance of Tourism) यामध्ये असे म्हटले आहे की, पर्यटन व अर्थव्यवस्था यामध्ये दोन प्रकारचे संबंध आहेत. यातील एक म्हणजे वर उल्लेखलेल्या पर्यटकांचा हव्या असलेल्या वस्तू की ज्यांचा अर्थव्यवस्थेत प्रत्यक्ष संबंध असतो आणि दुसरा म्हणजे असे व्यापारी की ज्यांचा इतर व्यापारी उद्योगांशी संबंध असतो.यावरुन असे स्पष्ट होते की, पर्यटकांना होणारा केवळ खर्च नव्हे तर वरीलप्रमाणे अनेक अप्रत्यक्ष खर्च व उत्पन्न यांचा अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो. यामध्ये अशा उद्योगांचा समावेश होतो की, जे पर्यटकांना सेवा व वस्तू पुरवितात. पर्यटनामुळे होणारे आर्थिक परिणाम महत्वाचे आहेत. पर्यटनाचे काही आर्थिक परिणाम पुढीलप्रमाणे आहेत. आर्थिक विकासाला सहाय्य, परकीय चलनाची प्राप्ती, रोजगाराची उपलब्धता, बाजारपेठांचा विकास, राष्ट्रीय उत्पन्नांत

वाढ, सरकारच्या महसुलात वाढ होते, देवघेवीचा समतोल, स्थानिक अर्थव्यवस्थेला मदत, प्रादेशिक विकास, इतर अर्थिक घटकांचा विकास.

पर्यटन भूगोलाचा अभ्यास :-

महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थिती, प्राकृतिक रचना, हवामान, जंगले, वन्ये, पशुपक्षी, जलाशय तसेच ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिक घटक पर्यटन भूगोलाच्या विकासास अनुकूल घटक आहेत. त्यामुळे पर्यटन भूगोल विकास झालेला आहे.

विषयाची निवड :-

"पुणे तेथे काय उणे" अशी देशभरात 'पुणे' जिल्ह्याची ख्याती आहे. जिल्ह्याचे मुख्य ठिकाण. मुळा-मुठेच्या संगमावर असलेलं, एके काळी पेशव्यांची राजधानी असलेलं हे शहर आज महाराष्ट्रातील महत्वाचे ऐतिहासिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व औद्योगीक केंद्र मानले जाते. विद्येचे माहेरघर म्हणून ही या नगरीचा परिचय सर्वदूर आहे. पुणे नगरी आणि जिल्ह्याला इतिहासकाळापासूनच अनन्यसाधारण महत्व आहे. या नगराला वा जिल्ह्यालाही पडणारी काही स्वप्ने आहेत. तसाच गौरवशाली भूतकाळही आहे.

साधारणत: इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात पुणे शहराचा प्रथम नामोल्लेख मिळतो. या नगराची पूर्वीची अनेक नावे इतिहासात आढळतात. पुन्नाटा (इ.स.दुसरे शतक टॉलेमी यांच्या लिखाणावरुन) पुनगडी, पुन:विषय, पुणे विषय, पुण्यपूर (८ वे शतक राष्ट्रकूट काळ), कसबे पुणे (मोगलकाळ), इत्यादी नावे संदर्भ ग्रंथात मिळतात. शिवाय घ्पुण्यङ या शब्दातून 'पुणे' नावाची उत्पत्ती झाली असावी असाही एक तर्क आहे.

पुण्याजवळचे 'जुन्नर' हे ठिकाण ख्रिस्तपूर्व ९० मध्ये दख्यनच्या हिंदुराजांच्या राजधानीचे शहर असून पुढे साधारणत: इ. सनाची पहिली तीन शतके बुध्द धर्मियांचे मुख्य स्थान होते असाही एक उल्लेख मिळतो. नंतर हा पुणे परिसर आंध्र राजांच्या राजवटिखाली गेला. उत्तरोत्तर येथे चालुक्य, राष्ट्रकुट या राजवटींनी प्राचीन काळात आपली सत्ता गाजविली. मध्ययुगात यादवांचा अंमल पुण्यावर होता. बहामनी, निजामशाही व आदिलशाही राजवटीही पुण्याने भोगल्या. शिवाजी महाराजांचा जन्म याच जिल्ह्यात जुन्नर जवळील शिवनेरी येथे झाला. त्यांचे सारे बालपण पुण्यातच गेले. घ्हिंदवी स्वराज्यङ हे स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा प्रथम विचार शिवरायांच्या मनात याच भूमित आला. मराठा राजवटित पुणे हे एक महत्वाचे राजकिय केंद्र होते. शिवराय आणि पुणे हे अतूट नाते आहे. भारतमातेच्या कतरेला लटकलेली तलवार असे ज्या सह्याद्री पर्वताचे वर्णन केले जाते. अशा सह्याद्रीच्या पर्वत रांगा या जिल्ह्यात आहेत. पुण्याचा इतिहास हा अत्यंत स्फुर्तिदायक

व कुठल्याही तरुणाला स्फुरण चढावे असा आहे. नंतरच्या काळात पुणे येथे बाजीराव पेशव्यांनी आपली राजधानी बसविली. परंतु नंतरच्या पेशव्यांना आपली राजवट दीर्घकाळ टिकविता आली नाही. इ. सं. १८१८ मध्ये दुर्देवी घटना घडली ती म्हणजे मराठेशाही संपुष्टात आली. पुण्याच्या इतिहासाला नवे वळण मिळाले अर्थात येथील शनिवारवाड्यावरील ‘भगव्या’ झेंड्याची जागा ब्रिटनच्या यूनियन जॅक ने घेतली. पुणे ब्रिटिशांच्या ताब्यात गेले.

ब्रिटिशांच्या ताब्यातुन मायभूमीला मुक्त करण्यासाठीच्या स्वातंत्र्यलढ्यात पुणे शहर अग्रभागी होते. आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांची कर्मभूमी पुणे हीच होती. महात्मा ज्योतीबा फुले, गोपाळ गणेश आगरकर,गोपाळ हरी देशमुख (लोकहीतवादी), लो.टिळक, गोपाळ कृष्ण गोखले, महर्षी धोंडो केशव कर्वे, चाफेकर बंधू, पंडिता रमाबाई इत्यादी राष्ट्रपुरुंष, क्रांतिकारकांची पुणे हीच कर्मभूमी होय. या सर्व राष्ट्रभक्तांनी ब्रिटिशांच्या जोखडातून आपली मातृभूमी मुक्त करण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले. अनेक अथक परिश्रमानंतर १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश स्वतंत्र झाला आणि पुण्याच्या शनिवारवड्यावरील ‘युनियन जॅक’ काढून तेथे अत्यंत शोभायमान असा ‘तिरंगा ध्वज’ फडकविण्यात आला.

याचा पुण्यात ज्योतीबांनी सावित्रीबाई फुले यांच्या सोबत इ.स. १८४८ साली बुधवार पेठेतील भिड्यांच्या वाड्यात पहिली मुलींची शाळा सुरु केली. येथेच विष्णुशास्त्री चिपळुणकर, पु.ल.देशपांडे, यदुनाथ थत्ते, एस.एम. जोशी, ग.प्र.प्रधान इत्यादींसारख्या दिग्गजांनी आपल्या कर्तृत्वाची बाग फलविली. सारांश पुणे शहराने अनेक स्थित्यंतरे पाहिली. त्यातूनही आपली विशेष ओळख निर्माण केली हे मात्र खरे.

पूणे जिल्हा हा पर्यटनाचेही माहेरघर आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही कारण पुणे जिल्ह्यामध्ये अनेक ऐतिहासिक किल्ले, लेणी व धार्मिक स्थळांचा समावेश होतो. पुणे जिल्ह्यात पुणे, आळंदी, खंडाळा, लोणावळा, पिंपरी चिंचवड, देहू, सासवड, जुन्नर, आर्वी, खोडद, उरुळी कांचन, राजगुरुनगर, चाकण, बनेश्वर, बारामती, बेट केडगाव, वढू (बु), भाटघर, बालचंदनगर, भोर, खेड-शिवापूर, तुळापूर, नाणेघाट, पानशेत, वडगाव, कामशेत, तळेगाव दाभाडे, वेल्हे, शिरुर, पौड, इंदापूर येथे पर्यटन स्थळ म्हणुन प्रसिध्द आहेत. तर लेण्यांसाठी कार्ले, भाजे, बेडसे, पाताळेश्वर ही ठीकाणे प्रसिध्द आहेत आणि धार्मिक स्थळांसाठी अष्टविनायकांचे स्थाने, भिमाशंकर येथील ज्योतिर्लिंग, रायरेश्वर मंदिर, जेजुरीचा खंडोबा, आळंदी येथील संजीवनी समाधी, देहू, नीरा नरसिंहपूर, नारायनपूर, केतकावळा, कमरअलीदरवेश ही ठीकाणे आहेत.

म्हणून पुणे जिल्ह्यातील पर्यटन विकास व रोजगाराच्या संधी या विषयाची निवड करण्यात आली. या प्रदेशामध्ये आपल्या राज्यातून आणि बाहेरच्या राज्यातून तसेच देश विदेशातून येणाऱ्या पर्यटकांची वार्षिक सरासरी संख्या किती आहे. हे समजावून घेणे कोणती संख्या किती आहे. हे समजवून घेणे, कोणती संख्या जास्त आहे आणि त्या पर्यटनामुळे त्या प्रदेशातील पर्यटन स्थळाचा विकास, रोजगाराला संधी, एकुण उत्पन्न सुशिक्षित बेरोजगाराला संख्या कशी कामी कटकात येत आहे यामुळे पुणे जिल्ह्यातील पर्यटन विकास आणि रोजगाराच्या संधी, पर्यटन स्थळे आणि भौगोलिक प्रदेशांचा अभ्यास करण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आली.

अभ्यास क्षेत्राची निवड :-

अभ्यास क्षेत्राची निवड करीत असताना त्या त्या भौगोलिक घटकांना किंवा अभ्यास क्षेत्राला अनन्यसाधारण एक महत्व असते. संबंधीत क्षेत्राची निवड करताना काही गोष्टी या विचारात घेतल्या जातात. पुणे जिल्ह्यातील पर्यटन विकास व रोजगाराच्या संधी याचा विचार करत असताना विकास आणि रोजगार कसा उपलब्ध झाला हे पहाणे गरजेचे आहे प्रस्तूत संशोधनाचा अभ्यास हा ऐतिहासिक स्थेळ, धार्मिक स्थळ, सांस्कृतिक स्थळ आणि प्राकृतिक/नैसर्गीक स्थळांचा विचार करुन अभ्यास क्षेत्राची निवड करण्यात येणारे आहे.

विषयाचे महत्व :-

पुणे जिल्ह्यातील पर्यटन विकास व रोजगाराच्या संधी याचा विचार करत असताना पुणे हे शहर एक भौगोलिकदृष्ट्या शैक्षणिक केंद्र आहे तसेच राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे शहर आहे. औद्योगिक विकास, धार्मिक विकास, सांस्कृतिक विकास पुणे जिल्ह्यातील पर्यटन स्थळे जी आहेत त्यात देहू, आळंदी, दगडूशेठ, लालमहाल, सारस बाग, लोणावळा, खंडाळा, एकविरादेवी, कार्ला, मळवळीचा किल्ला हि एकंदरित सर्व जी स्थळे आहेत पर्यटतन विकासा बरोबरच इरत रोजगाराच्या संधीही मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या आहेत. पर्यटनाचा विकास हा दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढल चालला आहे आणि त्याच बरोबर रोजगारही निर्माण मोठ्या प्रमाणात होत चालला आहे म्हणून या विषयाचे महत्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

१. पुणे जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचे वर्गीकरण करणे.
२. पर्यटन स्थळांचा विकास आणि विकासातील समस्यांचा अभ्यास करणे.
३. पर्यटन स्थळांच्या विकासातून निर्माण होणाऱ्या रोजगारांच्या संभाव्य संधीचा अभ्यास करणे.

४. दुर्लक्षित पर्यटन स्थळांचा अभ्यास करणे.
५. पर्यटन स्थळांचा विकास, रोजगाराच्या संधी व प्रदेशाचा विकास
६. पर्यटन स्थळांच्या विकासातील अडथळे शोधने व विकासासाठीच्या उपाय योजना सुचविणे.

गहितके :-

१. पर्यटनस्थळे अनेक समस्यांनी वेढलेले आहेत.
२. पूणे जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा अवश्यक तेवढा विकास झालेला नाही त्यामुळे रोजगार निर्मिती झालेली नाही.
३. पर्यटन स्थळांच्या संवर्धनासाठी व विकासासाठी शासन व संबंधित विभाग फारसे लक्ष देत नाही.
४. पूणे जिल्ह्यातील पर्यटन स्थळांना भेट देणाऱ्या पर्यटकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.

माहिती स्त्रोत व सेशांधन पध्दती :-

प्रस्तूत संशोधनासाठी आवश्यक माहिती प्राप्त करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम माहिती स्त्रोताचा उपयोग करण्यात येणार आहे. पूणे जिल्ह्यातील विविध पर्यटन स्थळांना प्रत्यक्ष भेटी देऊन तसेच तेथील पर्यटकांना भेटून प्रश्नावली व अनुसूचीच्या साह्याने प्राथमिक माहिती प्राप्त करण्यात येणार आहे. तर द्वितीय स्वरुपाची माहिती प्राप्त करण्यासाठी विषयाशी संबंधीत विविध संदर्भ ग्रंथ, साप्ताहिके, मासिके, संशोधन अहवाल, शोध निबंध, वर्तमान पत्रे, विविध कार्यालयाचे अहवाल यांचा उपयोग करण्यात येणार आहे आहे. प्रस्तूत संशोधन कार्यासाठी विषयाशी संबंधित जे संदर्भ ग्रंथ अवलोकन करण्यात आलेले आहेत त्याची थोडक्यात माहिती पुढील प्रमाणे आहे.

संबंधित साहित्याचा आढावा :-

१) संयुक्त राष्ट्र संमेलन (१९३७) :- यामध्ये सांख्यिकी तज्ञांनी पर्यटनाची शास्त्रशुध्द व्याख्या करण्याचे काम केले. १९४० च्या दशकात संयुक्त राष्ट्रांच्या संम्मेलनात जागतिक पर्यटन संघटनेची स्थापना करण्यात आली ज्यात पर्यटकांची व्याख्या करण्यात आली. त्यानंतरच पर्यटन विषयावर संशोधन कार्यात वृध्दी झाली.

२) एल. जे. लोकोरिश (१९६७) :- एल.जे. लोकोरिश यांनी Growth of Toourism मध्ये प्रवास साधनांचा पर्यटनावर होणारा परिणाम स्पष्ट केलेला आहे. ज्यामध्ये पर्यटनाच्या वाढीवरील सकारात्मक परिणाम स्पष्ट केलेला दिसून येतो.

३) मायकेल पिटर (१९६९) :- मायकेल पिटर यांनी ‘Economic Impact of Tourism’ या पुस्तकात देशी व विदेशी पर्यटकांकडून मिळणाऱ्या उत्पन्नावर विशेष प्रकाश टाकलेला दिसून येतो. १९७० नंतर पर्यटन दर्शन व नविन पर्यटन स्थळांच्या शोधावर थोडेफार संशोधन झाले त्यात गुहा व मंदिर यांचाही समावेश केला गेलेला आहे.

४) जोन्स इगसेसी, डी.एग्रीमा (१९८१) :- यांनी आपल्या ‘पर्यटक’ या पूस्तकात युरोप खंडातील देशातील पर्यटनावर अभ्यास केलेला दिसून येतो. तसेच ग्रिकविद्वान हुन्जीकर व क्राप्ट यांनी पर्यटनांसंबंधी माहिती गोळा करुन जागतिक पर्यटनाचा आढावा घेतलेला दिसूनय येतो.

५) ए.के. भाटिया (१९८३) :- यांनी भारतातील पर्यटन, इतिहास व विकास संदर्भात (Tourism in India, History and Development) मोठे कार्य केलेले असून त्यात त्यांनी पर्यटनाचा इतिहास, पर्यटनाचे प्रकार, समस्या व त्यावरील उपाय यांचा अभ्यास केलेला आहे.

६) यीपींग ली हैनन (२००४) :- सामाजिक पर्यटन एक अभ्यास चीन या विषयावरती त्यांनी आपले विचार मांडले आहे. त्यांनी चीनमधील सामाजिक पर्यटन विशद केले आहे. शेवटी त्यांनी असा निष्कर्ष मांडला की, सामाजिक पर्यटने ही पाश्चिमात्य आणि चायनिज पर्यटन ही दोन्हि शाश्वत विकासासाठी बौध्दिक व महत्वपूर्ण दृष्टिकोण मांडण्यात आले.

७) राणा प्रताप (२००५):- त्यांनी पर्यटन प्रादेशिक विकासास कारणीभूत घटक बिहार राज्याचा अभ्यासावरुन त्यांनी असे नमुद केले पर्यटन हे सर्वांगिन विकासासाठी अत्यावश्यक घटक आहेत. चीन, इजिप्त, भारत, म्यानमार, जपान व कोरिया या देशामध्ये पर्यटनास खूप संधी आहे.

८) प्रशांत भट्टाचार्य आणि अबनीकुमार भागबटी (२००५) :- लेखकाने आसाममधील डोंगराळ जिल्ह्यातील पर्यटन विकासाच्या शक्यता या विषयावरती लेख प्रकाशित केला. त्यांनी आसाम मधील कपाली जमुना, धामसिरी दऱ्या या पहाडी जिल्ह्यातील पर्यटन विकासाचा अभ्यास केला.

९) प्रमांग्शु चक्रवर्ती (२००६):- आपत्ती आणि पर्यटन उद्योग या विषयावर लेखकांने चर्चा करुन त्यांनी आपत्ती व्यवस्थापना बद्दल भूत, भविष्य आणि वर्तमानकाळातील व्यवस्थापनाविषयी अत्याआवश्यक विचार मांडले. त्यांनी पर्यटनाला एक उद्योग म्हणुन पाहिले. तसेच त्यांनी पर्यटन व्यवस्थापनासाठी योग्य उपाययोजना दिल्या.

१०) सोमदत्ता दास (२००६):- त्यांनी 'पर्यटन विकास- दार्जीलिंग शहर कांही समस्या' याचा अभ्यास केला. त्यांनी दार्जिलिंग शहरातील भौगोलिक वैशिष्ट्ये व लोकांची आर्थिक परिस्थिती स्पष्ट केली आहे.

११) सीमा चंडेल, साधाना तोमर, अतींद्रा सिंग तोमर, शैलेंद्रसिंग तोमर (२००६):- लेखकांनी पर्यटनातील पर्यावरण विषयक बदल आणि वातावरण हे स्पष्ट केले. त्यांनी शाश्वत विकास आणि पर्यावरण याचा अभ्यास केला.

१२) के.सी.रामोत्रा आणि सचिन पी.हुंदले (२००७):- पर्यावरण विषयक सामाजिक, आर्थिक स्थिती ता. पन्हाळा, जि. कोल्हापुर महाराष्ट्र हे पध्दतशीरपणे स्पष्ट केले. पन्हाळागड हे आकर्षक पर्यटन ठिकाण असल्यामुळे अनेक पर्यटक दरवर्षी भेट देतात त्यांनी पन्हाळा येथील सामाजिक, आर्थिक स्थितीबद्दल सविस्तर चर्चा केली.

१३) द्राक्षायणी द्वारकानाथ सरवदे (२०१२):- यांनी आपल्या 'औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा भेट देणाऱ्या पर्यटकांना येणाऱ्या समस्या- एक भौगोलिक अभ्यास' या लघु शोध प्रबंधात ओरंगाबाद येथील लेण्यांचा अभ्यास करुन तेथील पर्यटकांच्या समस्या मांडून शासकनाच्या निदर्शनास आणुन देण्याचे महत्वपूर्ण कार्य केले आहे.

१४) योगेश नारायन केदार (२०१५):- यांनी 'चाकरवाडी (ता.व जि.बीड) धार्मिक स्थळाचा भौगोलिक अभ्यास' या संशोधन साहित्यात चाकरवाडी येथील पर्यटन स्थळाचा सखोल अभ्यास केला आहे. त्यांनी या संशोधनाच्या माध्यमातून चाकरवाडी सारख्या पर्यटन स्थळाचे महत्व विशद केले.

प्रकरण योजना :-

प्रस्तुत शोध प्रबंध खालील प्रमाणे सहा प्रकरणात विभागला आहे.

प्रकरण १ ले : प्रस्तावना

पहिल्या प्रकरणात पर्यटनाचा परिचयात्मक अभ्यास करण्यात आलेला असून त्यामध्ये पर्यटनाचा परिचय, त्याचा अर्थ, व्याख्या, पर्यटनाचे स्वरुप, त्याची व्याप्ती व पर्यटनावर परिणाम करणारे घटक या संदर्भात उहापोह केलेला आहे. या बरोबरच प्रकरणाची उद्दिष्टे, गृहिते, संशोधन पध्दती, आणि प्रकरणांची रुपरेषा कशी करण्यात आली याचा आढावा घेण्यात आलेला आहे.

प्रकरण २ रे : अभ्यास क्षेत्राची भौगोलिक पार्श्वभूमी

दुसऱ्या प्रकरणात पूणे जिह्याबद्दल विस्ताराने माहिती दिलेली असून येथील तापमान, भाषा, हॉटेल्सची यादी, येथील हवामान, येथील लोकसंख्या, येथील जलप्रणाली,

वाहतूक साधने व पूणे जिल्ह्यातील पर्यटन स्थळांमध्ये लोणावळा या पर्यटन स्थळाचे महत्व व त्याची विशेषता याचा सविस्तर आढाव प्रस्तुत प्रकरणांमध्ये घेण्यात येणार आहे.

प्रकरण ३ रे : पर्यटन स्थळाचे वर्गीकरण :-

तिसऱ्या प्रकरणात पूणे जिल्ह्यातील पर्यटन विषयक विस्तृत माहिती दिलेली असून त्यांचा सविस्तर आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

पूणे जिल्ह्यातील असलेल्या पर्यटन स्थळांचा ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, या सर्व घटकांचा वर्गीकरणात्मक सविस्तर आढावा प्रस्तूत प्रकारनामध्ये घेण्यात येणार आहे.

प्रकरण ४ थे : पर्यटन स्थळांच्या समस्या व दुर्लक्षित पर्यटन स्थळे

पूणे जिल्हा हा पर्यटनाच्या दृष्टिकोणातुन महत्वपूर्ण जिल्हा असून सुध्दा पर्यटनाच्या बाबतीत अनेक समस्या निर्माण झाले आहेत. व अशी काही पर्यटन स्थळे आहेत की, त्याकडे पर्यटन विभागाने संपूर्ण दुर्लक्ष असून तेथील पर्यटन लोप पावत आहेत तेंव्हा अशा सर्व पर्यटन स्थळाजवळील समस्यांचा यथोच्छित आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण ५ वे : पर्यटन स्थळाचा विकास व रोजगाराची संधी

भारत हा लोकसंख्येच्या बाबतीत जगात दुसरा देश असून मोठ्या प्रमाणात येथे बेरोजगारीची समस्या आहे तेंव्हा लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिकोणातून पर्यटनाचा विकास होणे आवश्यक आहे. शासन स्तराकडून व लोकवाट्यातून या क्षेत्राचा कसा विकास करता येईल याचा ही आढावा येथे घेण्यात येणार आहे. पर्यटनाचा विकास झाल्यास लोकांना रोजगाराला संधी प्राप्त होते तेंव्हा पर्यटन स्थळाच्या विकासासाठी शासनाने उपया योजना करणे आवश्यक ठरते. म्हणून पर्यटन स्थळाला विकासाच्या माध्यमातुन लोकांना रोजगाराला संधी कशी उपलब्ध करुन देता येईल या संबंधीचा सविस्तर आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण ६ वे : निष्कर्ष आणि उपाय योजना

या प्रकरणामध्ये अभ्यासकांनी केलेल्या अभ्यासावरुन पूणे जिल्ह्यातील पर्यटन स्थळे व परिसरात ज्या समस्या आहेत त्या येथे मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. केवळ तेथील समस्यांचाच अभ्यास करण्यात आला नसून ज्या समस्या तेथे आहेत त्या समस्या कशा दुर करता येतील याबाबद उपाय योजनाही करण्यात आले आहे जेने करुन सरकार व पूणे जिल्ह्यातील स्थानिक शासनाला तेथे सुधारणा करण्यास मदत होईल.

संदर्भग्रंथ सूची :-

1 संयूक्त राष्ट्र संम्मेलन (१९३७)

2 एल. जे. लोकोरिश (१९६७), Growth of Toourism.

3 मायकेल पिटर (१९६९), Economic Impact of Tourism

4 जोन्स इगसेसी, डी.एग्रीमा (१९८१)

5 ए.के. भाटिया (१९८३), भारतातील पर्यटन, इतिहास व विकास (Tourism in India, History and Development)

6 यीपींग ली हैनन (२००४), सामाजिक पर्यटन एक अभ्यास-चीन

7 राणा प्रताप (२००५), पर्यटन प्रादेशिक विकासास कारणीभूत घटक- बिहार

8 प्रशांत भट्टाचार्य आणि अबनीकुमार भागबटी (२००५), आसाममधील डोंगराळ जिल्ह्यातील पर्यटन विकासाच्या शक्यता

9 प्रमांग्शु चक्रवर्ती (२००६), आपत्ती आणि पर्यटन उद्योग

10 सोमदत्ता दास (२००६), 'पर्यटन विकास- दार्जीलिंग शहर कांही समस्या'

11 सीमा चंडेल, साधाना तोमर, अतींद्रा सिंग तोमर, शैलेंद्रसिंग तोमर (२००६), पर्यटनातील पर्यावरण विषयक बदल आणि वातावरण

12 के.सी.रामोत्रा आणि सचिन पी.हुंदले (२००७), पर्यावरण विषयक सामाजिक, आर्थिक स्थिती ता. पन्हाळा, जि. कोल्हापुर

13 द्राक्षायणी द्वारकानाथ सरवदे (२०१२), 'औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा भेट देणाऱ्या पर्यटकांना येणाऱ्या समस्या- एक भौगोलिक अभ्यास'

14 योगेश नारायन केदार (२०१५), 'चाकरवाडी (ता. व जि.बीड) धार्मिक स्थळाचा भौगोलिक अभ्यास'

15 Anand M.M.(1976): "Tourism and Hotel Industry in India," Prentic holl of india Pvt.Ltd., New Delhi.

16 P.Hagget, Geography In.R.J.Jonston etal. (eds) (1981) : "Oxford basil Blackwell", P.136

17 A.K.Bhatia (1983) : "Tourism Development, Principles and Practices," Strling Publications, New Delhi,

18 Anju (1998): "Management of Tourism- A case study of Punjab Tourism Development corporation" Ph.D Thisis, Punjab University, Patiala.

19 Anjali Varma (2008): “Tourism development and possibility in India”, Omega Publication, New Delhi.
20 काळे भाग्यश्री-जगप्रसिध्द भारतीय स्मारके
21 कुलकर्णी शिल्पा-महाराष्ट्रातील पर्यटन
22 खतिब के.ए.-पर्यटन भूगोल
23 घारपूरे विठ्ठल-पर्यटन भूगोल
24 शिंदे एस.बी. पर्यटन भूगोल (भाग दोन)
25 विवेक सौताडेकर- आपला पुणे जिल्हा
26 हणमंते एस. आर.-अजंठा बुध्द लेणी-जागतिक वारसा
27 वेबसाईड्स
१) www.wikimapia.org
२) www.mapsofindia.com
३) www.tourism.com
४) www.pune.nic.in
५) www.maharashtra.gov.in
६) www.lokrajhya.com
मासिके
१. लोकराज्य मासिक
२. योजना मासिक
३. लोकसत्ता
४. दैनिक महाराष्ट्र टाईम्स.

संशोधक
गोंड रामराव संभाजी

संशोधन मार्गदर्शक
डॉ. वाघमारे नामदेव केशवराव
भूगोल विभाग प्रमुख
इंदिरा गांधी महाविद्यालय सिडको नांदेड